**डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**
**कृषि विज्ञान केंद्र, लांजा, जि. रत्नागिरी**

जा.क्र./कृविके/ १२५/२०१९ दिनांक :– 11 JUN 2019

**जाहीर नोटीस**

**विषय :** कृषि विज्ञान केंद्र, लांजा प्रक्षेत्रावरील विविध विभागातील निर्धारीत कामे ठेका पध्दतीने करण्यासाठी दरपत्रके मागविणेबाबत....

कृषि विज्ञान केंद्र, लांजा प्रक्षेत्रावरील खालील विभागातील दि. **०१/०७/२०१९** ते दि. **३०/०९/२०१९** या कालावधीतील निर्धारीत कामे ठेका पध्दतीने करण्यासाठी इच्छूक ठेकेदारांकडून कामाच्या स्वरूपानुसार दरपत्रके मागविण्यात येत आहेत. इच्छूक ठेकेदारांनी ***मा. कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, लांजा, जि. रत्नागिरी*** या नावे आपले दरपत्रक **दि. २५/०६/२०१९** पर्यंत या कार्यालयास सादर करावे. करावयाच्या कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | विभाग | करावयाच्या कामाचा तपशील | आवश्यक मजूर |
|---|---|---|---|
| ०१ | प्रक्षेत्र तसेच नर्सरी | सका. ०८ ते सायं. ०४ , सायं. ०४ ते रात्री १२ व रात्री १२ ते सका. ०८ — या वेळेत प्रक्षेत्राची राखण करणे तसेच अनुषंगिक इतर कामे करणे. | ०३ |
| ०२ | प्रक्षेत्र | ट्रॅक्टरने कल्टीव्हेटर मारून रोटाव्हेटर मारणे, भात लागवडीसाठी चिखलणी करणे, भात (०.७० आर साठी ) तसेच नागली (०.३० आर साठी ) रोपवाटीकेमधील रोपांची काढणी करून लागवड करणे, खते देणे, भाताचे बांध तसेच खाचरांमधील, नागली पिकांमधील गवत काढणे, भुईमुग पिकास भर तसेच खते देणे, बेणणी करणे तसेच अनुषंगिक इतर कामे करणे. | ०३ |
| ०३ | नर्सरी | आंबा, चिकु तसेच कोकम कलमे बांधणेकरीता ३०००० नग पिशव्या भरणे, शेडमध्ये लावणे, कोकम व खिरनी बियाणे वाफयावर रूजत घालणे, कोकम व खिरनी रोपे तसचे आंबा कलमे पिशव्यांमध्ये लावणे, पाणी देणे, प्रक्षेत्राची साफसफाई करणे, तसेच अनुषंगिक इतर कामे करणे. | ०३ |
| ०४ | नर्सरी | कलमे/रोपे इत्यादिंना पाणी घालणे, किटकनाशक तसेच बुरशीनाशकाची फवारणी/आळवणी करणे, फूट काढणे, तसेच अनुषंगिक इतर कामे करणे. | ०२ |
| ०५ | नर्सरी | आंबा कलमे बांधणीकरीता मातृवृक्ष बागेमधील झाडांवरील कलम काडया काढणे, कलमे बांधणे. आंबा, काजु मातृवृक्ष बागा तसेच नारळ बागेमधील झाडांभोवती रिंगा खणणे व खते घालुन रींगा बुजविणे तसेच अनुषंगिक इतर कामे करणे. | ०३ |

**दरपत्रके सादर करण्यासंबंधीच्या अटी व शर्ती :–**

- दिलेली कामे कार्यालयीन वेळेतच पूर्ण करावयाचे आहे. ( सका. ०८ ते १२ व दुपारी ०२ ते ०५.४५ )
- दरपत्रकात प्रती मजूर प्रती दिवस या प्रमाणे मजूरीचा दर नमूद करावा.
- ठेका कामासंबंधीच्या सविस्तर अटी व शर्ती या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावणेत आल्या आहेत. अधिक माहितीसाठी श्री जे. जे. दुबळे (प्रक्षेत्र व्यवस्थापक) यांचेशी कामाचे दिवशी संपर्क साधावा (सका. ०८ ते १२ व दुपारी ०२ ते ०५.४५ )
- कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व दरपत्रके नाकारण्याचे हक्क या कार्यालयाने राखून ठेवले आहेत.

**कार्यक्रम समन्वयक,**
कृषि विज्ञान केंद्र, देवधे,लांजा

**प्रत प्रसिध्दीसाठी रवाना :–**

१. कायार्लयीन नोटीस बोर्ड
२. प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, डॉबासाकोकृवि, दापोली.